# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## आणि

# मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर

## यांच्या संयुक्त विद्यमाने

## “एकदिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबीर”

## Health Check Up Camp

**दिनांक :- २३ फेब्रुवारी २०२६**

**वेळ :- सकाळी ११:३०**

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल आणि मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने **“एकदिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबीर”** सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले या होत्या. मेडिकव्हर हॉस्पिटल खारघरचे मॅनेजर श्री. सचिन श्रीवास्तव, डॉ. मोहम्मद तारीक आणि डॉ. दुहिता सुरवाडे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून लाभले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन व आयोजन प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. तसेच श्री संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करीत कार्यक्रमाला लाभलेल्या अतिथींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. सचिन श्रीवास्तव यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासोबतच त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांचेही आरोग्य तितकेच महत्त्वाचे आहे, असे मौल्यवान कार्य करण्यासाठी या महाविद्यालयाची निवड केल्याचे व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मेडिकव्हर हॉस्पिटलचे सदस्य डॉ. मोहम्मद तारीक यांनी कशा पद्धतीने आपण आपल्या आरोग्याची वेळच्यावेळी तपासणी

करणे गरजेचे आहे, हे सांगितले. डॉ. दुहिता सुरवाडे यांनी पावर पॉइंट प्रेझेंटेशनच्या सहाय्याने सादरीकरण करून फास्टफूड किती धोक्याचे आहे हे सांगितले. त्यावरती आपण काय उपाययोजना करणे गरजेचे आहे व योग्य तो आहार घेणे किती महत्त्वाचे आहे, हे सांगितले. तसेच डॉ. मोहम्मद तारीक यांनी प्राथमिक उपचाराचे महत्त्व सांगत शाळेमध्ये व कोणत्याही प्रसंगी आपण कशा पद्धतीने सहाय्य करू शकतो, हे सांगितले. तसेच त्यांनी प्रात्यक्षिकांद्वारे हृदयविकाराचा झटका आलेल्या व्यक्तीला कशा पद्धतीने सीपीआर द्यावा, हे समजावले. त्यांनी स्वतः हे प्रात्यक्षिक दाखवून सर्व छात्राध्यापकांकडून प्रात्यक्षिक करून देखील घेतले. तसेच हे प्रात्यक्षिक करताना रुग्णाची स्थिती, मान कशा पद्धतीने ठेवावी व आपण कशा पद्धतीने त्या रुग्णाला व परिस्थितीला हाताळावे, हे योग्य पद्धतीने समजावून सांगितले. द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. मयुरी बेहेरे यांनी आभार प्रकटीकरण केले.

सिल्वरलीफ डेंटल क्लिनिक, पनवेल मधील दंत शल्यचिकित्सक डॉ. मनोज पाचंगे यांनी प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांच्या दंताची तपासणी केली. मेडिकव्हर हॉस्पिटलचा नर्सिंग स्टाफ तृषीका आयरकर, अक्षता मासाळ यांनी प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांची मधुमेह आणि रक्तदाब तपासणी करण्यात आली. डोळ्यांची तपासणी करण्यासाठी आलेल्या साई आणि अतीन यांनी योग्य ती डोळ्याची तपासणी करून चष्म्याच्या विविध फ्रेम देखील सर्वांना उपलब्ध करून दिल्या. तसेच श्री सचिन श्रीवास्तव यांनी वेगवेगळे उपक्रम घेऊन छात्राध्यापकांचा मेंदू तल्लख आहे, तसेच फुफ्फुस योग्यरीत्या काम करत आहे, याची खात्री करून घेतली. आरोग्य तपासणी शिबिरामध्ये प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापकांसोबत महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी देखील शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती स्मितल कुरूप यांनी केले.







महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले आणि प्रमुख अतिथी श्री. सचिन श्रीवास्तव दीपप्रज्वलन करताना







श्री. सचिन श्रीवास्तव आणि डॉ. दुहिता सुरवाडे यांचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले





कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. स्मितल कुरूप




कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार प्रास्ताविक करताना





श्री. सचिन श्रीवास्तव आणि डॉ. मोहम्मद तारीक छात्राध्यापकांना मार्गदर्शन करताना




आरोग्य विषयक माहिती सांगताना डॉ. दुहिता सुरवाडे






सी.पी.आर. विषयक प्रात्यक्षिकाचे मार्गदर्शन करताना डॉ. मोहम्मद तारीक







सी.पी.आर. चे प्रात्यक्षिक करताना प्रथम व द्वितीय वर्ष छात्राध्यापक







नर्सिंग स्टाफ तृषीका आयरकर, अक्षता मासाळ छात्राध्यापकांची मधुमेह आणि रक्तदाब तपासणी करताना







श्री. साई आणि अतीन छात्राध्यापकांच्या डोळ्यांची तपासणी करताना







दंत शल्यचिकित्सक डॉ. मनोज पाचंगे छात्राध्यापकांच्या दंताची तपासणी करताना







डॉ. मोहम्मद तारीक आणि डॉ. दुहिता सुरवाडे छात्राध्यापकांची तपासणी करताना




द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्रीमती. मयुरी बेहेरे आभार प्रकटीकरण करताना



# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## आणि

# मेडीकव्हर हॉस्पिटल, खारघर सेक्टर 10

यांच्या संयुक्त विद्यमाने

## "एकदिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबीर"

## निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात येत आहे की, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे **"एकदिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबीर"** आयोजित करण्यात येत आहे. तरी या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## प्रमुख अतिथी

**सचिन श्रीवास्तव**
मॅनेजर, मेडीकव्हर हॉस्पिटल, खारघर

**डॉ. मोहम्मद तारिक**
मेडीकव्हर हॉस्पिटल, खारघर

**डॉ. मनोज पाचंगे**
दंत शल्यचिकित्सक,सिल्व्हरलीफ डेंटल क्लिनिक

**डॉ. श्रद्धा भोईटे**
दंत शल्यचिकित्सक, सिल्व्हरलीफ डेंटल क्लिनिक

### मार्गदर्शक

**डॉ. प्रियांका सुभेदार**
प्राध्यापक, शा. अ. म. पनवेल



### अध्यक्ष

**डॉ. रमा भोसले**
प्राचार्य, शा. अ. म. पनवेल



दिनांकः – २३ फेब्रुवारी २०२६

स्थळः– सरस्वती कक्ष

वेळ: - ११:००



# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.


## आणि

# मेडीकव्हर हॉस्पिटल, खारघर सेक्टर 10

### यांच्या संयुक्त विद्यमाने

## “एकदिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबीर”

## कार्यक्रम पत्रिका



| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन | मा. प्राचार्य व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते |
| स्वागत | मा. प्राचार्य, प्रमुख अतिथी, प्राध्यापक |
| प्रास्ताविक | प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार |
| अतिथी मार्गदर्शन | श्री. सचिन श्रीवास्तव |
| अतिथी मार्गदर्शन | डॉ. मोहम्मद तारिक |
| आरोग्यविषयक सादरीकरण | मेडीकव्हर हॉस्पिटल |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार प्रकटीकरण | श्रीमती. मयुरी बेहेरे |
| आरोग्य तपासणी | डॉ. मोहम्मद तारिक<br>डॉ. मनोज पाचंगे<br>डॉ. श्रद्धा भोईटे |
| सूत्रसंचालन | श्रीमती. स्मितल कुरूप |
| फोटोग्राफी व व्हिडिओ | श्री. निमिष जाधव, श्री. रोहन भोईर |

**दिनांक: – २३ फेब्रुवारी २०२६** **वेळ: - ११:००**

**स्थळ:– सरस्वती कक्ष**